मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय सहाय्यता मिळणेकरिता जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

## मुख्यमंत्री सचिवालय

परिपत्रक क्रमांक :- मुमंसनि-२०२५/प्र.क्र.०२/निधी कक्ष

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- २२.०१.२०२५

परिपत्रक :-

मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातील "मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा" मार्फत अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. या संदर्भात मदत मिळण्यासाठी असंख्य अर्ज मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त होतात. संबंधित जिल्ह्यातून प्राप्त होणाऱ्या अर्जांचा आढावा घेणे, नागरीक / रुग्णालय यांच्या समस्यावर विचार करणे व आवश्यतेनुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास शिफारशी पाठविणे या करीता जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्याची बाब विचाराधीन होती.

२. त्यानुसार जिल्हास्तरावर खालील प्रमाणे "जिल्हास्तरीय समिती" गठीत करण्यात येत आहे.

अ) जिल्हास्तरीय समिती :-

| अ.क्र. | पदनाम | पद | संख्या |
|---|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी | अध्यक्ष | १ |
| २. | जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अधिष्ठाता किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य | १ |
| ३. | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य | १ |
| ४. | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य | १ |
| ५. | धर्मादाय निरीक्षक (रुग्णालये) | सदस्य | १ |
| ६. | जिल्हा समन्वयक, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | सदस्य | १ |
| ७. | वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ (नामनिर्देशनाद्वारे) | सदस्य | २ |
| ८. | सामाजीक क्षेत्रातील तज्ञ (नामनिर्देशनाद्वारे) | सदस्य | २ |
| ९. | जिल्हास्तरीय मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रतिनिधी | सदस्य सचिव | १ |

आ) समितीची कार्ये

I. संबंधित जिल्ह्यातून मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास पाठविण्यात आलेल्या अर्जाचा आढावा घेणे.

II. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षासंदर्भात जिल्ह्यातील नागरिक / रुग्णालये यांच्या समस्यांवर विचार करणे व आवश्यतेनुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास शिफारशी पाठविणे.

III. रुग्ण /नातेवाईक यांच्याकडून रुग्णालयाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास सदर तक्रारी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे पाठविणे.

IV. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देणग्यांचा ओघ वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

V. सदर समितीतील सदस्य त्यांचे नियमित कामकाज सांभाळून समितीचे कामकाज पाहतील.

४. समितीतील नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्याबाबतचे निकष जिल्हाधिकारी यांना स्वंतत्रपणे कळविण्यात येतील. इतर सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित करावेत.

५. सदर परिपत्रक मुख्यमंत्री सचिवालयाच्या cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

SHARAD RAMLING GHAVATE
Digitally signed by SHARAD RAMLING GHAVATE
Date: 2025.01.22 18:42:58 +05'30'

(शरद रा. घावटे)
कक्ष अधिकारी
मुख्यमंत्री सचिवालय

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
२. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मुख्यमंत्री सचिवालयातील सर्व अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
८. सर्व नोंदणीकृत रुग्णालये.
९. निवड नस्ती.